सत्यप्रभा दि 29/03/2023

# राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत पोलीस अंमलदारांचे यश



**नांदेड दि.२८ –** मास्टर्स गेम्स फेडरेशन, उत्तर प्रदेश यांच्याद्वारे नाशिक येथे आयोजीत ५ व्या राष्ट्रीय मास्टर्स जलतरण स्पर्धेत नांदेड जिल्हा पोलीस दलातील अंमलदार जयप्रकाश मोतीराम क्षीरसागर व रामेश्वर राजकुमार जाधव यांनी एकुण ६ पदकाची कमाई केली.

मास्टर्स गेम्स फेडरेशन, उत्तर प्रदेश यांनी नाशिक येथे ५ व्या राष्ट्रीय मास्टर्स जलतरण स्पर्धे चे आयोजन विर सावरकर जलतरणीका, नाशिक येथे केले होते. या स्पर्धेत १० राज्यातील ३५० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यात महाराष्ट्र राज्यातील संघात सहभागी असलेल्या नांदेड जिल्हा पोलीस दलातील अंमलदार जयप्रकाश मोतीराम क्षीरसागर यांनी ५० मीटर फ्रीस्टाईल प्रकारात गोल्ड मेडल, ५० मीटर बटरफ्लाय प्रकारात गोल्ड मेडल व २०० मीटर वैयक्तीक मीडले रीले प्रकारात गोल्ड मेडल असे एकुण तिन सुवर्ण पदकांची कमाई केली तर पोलीस अंमलदार रामेश्वर राजकुमार जाधव यांनी ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात गोल्ड मेडल, १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात गोल्ड मेडल व ५० मीटर फ्रीस्टाईल प्रकारात ब्रॉन्झ मेडल पटकावत एकुण तिन मेडल्सची कमाई केली.